देहूतील संत जिजाबाई कन्या विद्यालयात सायबर सुरक्षा उपक्रमात सहभागी विद्यार्थी.

एमआयटी कॉलेज आणि क्विक हील फाउंडेशनचा संयुक्त 'सायबर सुरक्षा'

पिंपरी : आळंदी येथील एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज आणि क्विक हील फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' हा उपक्रम यशस्वीपणे राबवला जात आहे. देहूमधील संत जिजाबाई कन्या विद्यालय येथे नुकतीच कार्यशाळा झाली. डिजिटल युगात विद्यार्थ्यांना आणि नागरिकांना सायबर गुन्ह्यांविषयी सजग आणि सुरक्षित बनवणे, हे या उपक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

एमआयटी कॉलेजचे विद्यार्थी हिंदवी खरमाळे आणि मानस पाटील यांची 'सायबर वॉरियर्स' म्हणून निवड झाली. त्यांनी परिसरातील विविध शाळांमध्ये जाऊन फिशिंग, ऑनलाइन फसवणूक, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, पासवर्ड व्यवस्थापन यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर कार्यशाळा घेतल्या.